# महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ

**वनभवन, ३रा माळा, बी - विंग, रामगीरी मार्ग, सिव्हील लाईन्स,**

**नागपूर - ४४०००१. ✆: ०७१२-२५५६७९१**


सत्यमेव जयते

Maharashtra State Biodiversity Board

## जा हि रा त

महाराष्ट्र शासनाने नव्याने स्थापित केलेल्या महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ कार्यालयासाठी अंदाजे १ वर्ष कालावधीकरिता विहित अटी व शर्तीनुसार, करार पध्दतीने मानधन तत्वावर खालील प्रमाणे संमंत्रक / औषधी तज्ञ, (consultant/expert) नेमावयाचे आहेत. त्यासाठी इच्छूक उमेदवाराकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जदारांनी आपला पासपोर्ट आकाराचा फोटो, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल इत्यादी तपशिल अर्जात नमूद करावा. खालील पदे तात्पुरत्या स्वरूपाचे व मर्यादीत कालावधीसाठी असून निवड झालेल्या उमेदवारास कामाची निकड व त्यांची योग्यता तपासून एक वर्षाचे आत सुध्दा एक महिन्याची पुर्वसूचना देऊन पदमुक्त करण्याचे अधिकार मंडळाकडे आहेत.

| अ.क्र. | पदनाम | संख्या | मानधन | पात्रता व योग्यता |
|---|---|---|---|---|
| १ | जैविक समंत्रक (Bio-Consultant) | १ | मंडळाने ठरविल्या प्रमाणे / शासकिय नियमाप्रमाणे | (१) शासकिय सेवेतून सेवानिवृत्त उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी<br>(२) जैविविधता व्यवस्थापनासंबंधीचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>(३) वय - किमान ६२ वर्षाचे आंत असावे.<br>(४) संगणकाचे व Internet चे ज्ञान आवश्यक आहे. तसेच इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेवर प्रभुत्व असावे व त्या भाषेमध्ये मसूदे तयार करता येणे आवश्यक आहे. |
| २ | Consultant (Legal) कायदेविषयक सल्लागार | १ | मंडळाने ठरविल्या प्रमाणे | (१) एल.एल.बी. ची मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>(२) पर्यावरण, वन, वन्यजिव विषयक, जैवविविधता कायद्या अंर्तगत न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याचा अनुभव आवश्यक.<br>(३) संगणकाचे- M.S.Office, Word/Excel, Internet चे ज्ञान आवश्यक आहे. तसेच इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेवर प्रभुत्व आणि इंग्रजी व मराठी भाषेमध्ये कायदेविषयक मसूदे इत्यादी तयार करता येणे आवश्यक आहे.<br>(४) कायदेविषयक कामाचा १ वर्षाचा अनुभव आणि पर्यावरण व्यवस्थापन कायदा यामधील डिप्लोमा धारक अर्जदारास प्राथमिकता देण्यात येईल. |
| ३ | औषधी तज्ञ (Pharmaceutical Expert) | १ | मंडळाने ठरविल्या प्रमाणे | (१) विज्ञान शाखेतील पदवीधर आणि औषधी शास्त्रात B. Pharm किंवा D. Pharm.<br>(२) औषधीशास्त्र कार्याचा कमीत कमी १ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>(३) संगणकाचे- M.S.Office, Word/Excel, Internet चे ज्ञान आवश्यक. इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेवर प्रभुत्व असावे. |

१. इच्छुक उमेदवाराने त्यांचे वैयक्तिक, शैक्षणिक तसेच अनुभवाबाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली छायाप्रत या कार्यालयाकडून विहित केलेल्या प्रपत्रातील अर्जासह दिनांक १५-०१-२०१३ चे आत कार्यालयीन वेळेत सादर करावे. अर्जाचा नमुना तसेच अधिकची माहिती महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यालयातून कार्यालयीन कामाचे दिवशी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ पर्यंत) प्राप्त करून घ्यावे.

२. अर्जाची छाननी/तपासणी करून पात्र उमेदवारास प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रे सोबत आणावेत. मुलाखतीची तारीख वेगळयाने कळविण्यात येईल. उमेदवाराने वरील दर्शविलेल्या कार्यालयात मुलाखतीचे दिनांकास व वेळेवर निवड समिती समोर प्रत्यक्ष उपस्थित राहावे. उमेदवारास जाण्यायेण्याचा कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता किंवा इतर खर्च दिला जाणार नाही.

३. निवड झालेल्या उमेदवारास रू.१०० चे स्टँप पेपरवर ह्या कार्यालयाने विहीत केलेल्या नमुन्यात करारनामा करावा लागेल.

४. करार पध्दतीने मानधन तत्वावर कामाकरिता ठेवण्यात येणा-या उमेदवारास कोणत्याही दिवशी पूर्व सूचना न देता कामावरून कमी करण्याचे तसेच निवडीबाबतचे सर्व अधिकार सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर यांनी राखून ठेवले आहे.

५. सदरची जाहिरात www.mahaforest.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**सदस्य सचिव,**
**महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ,**
**नागपूर**